नि.फौ.ख.क्र. १२९/२०२२
सरकार वि. मनोज कांबळे
**निशाणी क्र. १८**

**<u>अभियोगपक्षाच्या विनंतीवरुन सदर साक्षीदाराची साक्ष इन कॅमेरा द्वारे नोंदविण्यात येत आहे.</u>**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– परवीन मौला शिकलगार
**वय** :– ३२ वर्षे, **धंदा** :– काहीनाही
**राहणार** :– खरसुंडी, ता.आटपाडी, जि. सांगली.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्री बी.डी.काळे, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत</u>**

**०१.** माझ्या घरी माझी आई आणि भाऊ असे एकत्र राहतात. मी आरोपीला ओळखत नाही. कोणाच्या विरुध्द फिर्याद दिली आहे हे मला सांगता येत नाही. फिर्यादमध्ये काय मजकूर लिहीलेला आहे हे मला सांगता येणार नाही. फिर्यादवर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. फिर्यादीवरील सहीपुरते **<u>निशाणी क्र.१९</u>** देण्यात येते.

**<u>सदर साक्षीदार अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे विद्यमान सहा. सरकारी वकील यांना तोंडी विनंती वरुन साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली</u>**

**०२.** असे घडले नाही की दिनांक ०६/०८/२०२१ रोजी दुपारी २.०० च्या सुमारास आरोपीने मला जॉब लावून देतो असे कारण सांगून माझा विश्वास संपादन केला आणि माझ्या शाळेचे सर्व मूळ कागदपत्रे थोडया दिवसात परत देतो असे सांगून घेवून गेला आणि त्यानंतर मी वारंवार मागणी करुनही आरोपीने माझे मूळ कागदपत्रे परत दिली नाहीत आणि मला मी त्याच्याविरुध्द केलेली रेपची केस मागे घे नाहीतर कागदपत्रे देणार नाही आणि बदनामी करेन अशी धमकी देवू लागला.

नि.फौ.ख.क्र. १२९/२०२२
सरकार वि. मनोज कांबळे
**निशाणी क्र. १८**

आता मला माझ्या फिर्यादीमधील पोर्शन मार्क अ वाचून दाखविला. तो मी पोलिसांना सांगितला नव्हता. सदर बाब माझ्या फिर्यादीत नमूद असण्याचे कारण मला सांगता येणार नाही.

**०३.** हे खरे आहे की, माझे व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे आणि मला प्रस्तुतचे प्रकरण आरोपीविरुध्द पुढे चालवायचे नाही. आता मला तडजोड पुरसिस निशाणी क्र.१७ दाखवली. त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकुर बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी व मी एकाच गावचे आहोत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होऊ नये म्हणुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे – श्री.आर.एन.पडळकर विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु**

**नाकारला.**

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,
समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.10.15 16:05:18 +0530

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी

दि.१५/१०/२०२५
आटपाडी.